पिछाडीनंतर गुजरातची झुंज

पुणे : महाराष्ट्राच्या शेवटच्या जोडीने लांबवलेला डाव आणि त्यानंतर गुजरातने स्वीकारलेले सावध फलंदाजीचे धोरण यामुळे रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या 'क' गटातील महाराष्ट्र विरुद्ध गुजरात सामना अनिर्णित राहण्याची चिन्हे आहेत. पहिल्या डावातील पिछाडीनंतर गुजरातने कडवी झुंज दिली. तिसऱ्या दिवसअखेर गुजरातने दुसऱ्या डावात ३ बाद २२७ धावा केल्या असून, त्यांच्याकडे एकूण १२० धावांची आघाडी आहे.

गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर सुरू असलेल्या या सामन्यात तिसऱ्या दिवशी प्रदीप दाढे आणि तनय संघवी यांनी चिकाटीने फलंदाजी करत महाराष्ट्राचा डाव लांबवला. दुसऱ्या दिवसअखेरच्या ९ बाद २७८ धावसंख्येवरून पुढे खेळताना महाराष्ट्राचा दुसरा डाव तिसऱ्या दिवशी पहिल्या सत्रातील तासाभराच्या खेळानंतर ३३० धावांवर आटोपला. दाढे आणि संघवी यांनी सुमारे २० षटके फलंदाजी करताना ५२ धावांची भर घातली. या जोडीने शेवटच्या गड्यासाठी ६० धावांची भागीदारी केली. दाढेने ३२ धावांवर नाबाद राहत महाराष्ट्राचा डाव पुढे नेला.

संक्षिप्त धावफलक

- **गुजरात (पहिला डाव) :** २२७
- **महाराष्ट्र (पहिला डाव) :** १२०.३ षटकांत सर्वबाद ३३० (सौरभ नवले ९५, हर्षल काटे ८४, दिग्विजय पाटील ४३, प्रदीप दाढे नाबाद ३२; चिंतन गाजा ३/७६, सिद्धार्थ देसाई ३/६०)
- **गुजरात (दुसरा डाव) :** ६७ षटकांत ३ बाद २२७ (आर्य देसाई नाबाद १३२, मनन हिंग्राजीया ३३, जयमीत पटेल नाबाद २९; प्रदीप दाढे १/३३)

सॅमसनकडून संघहिताला प्राधान्य!

सूर्यवंशीसाठी सलामीचे स्थान सोडल्याबद्दल अभिषेककडून कौतुक

वृत्तसंस्था, वेलिंग्टन

न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यात युवा वैभव सूर्यवंशीसाठी संजू सॅमसनने आपले सलामीचे स्थान सोडले. त्याने निःस्वार्थीपणा दाखवून वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपेक्षा संघहिताला प्राधान्य दिले. हे नक्कीच शिकण्यासारखे आहे, असे म्हणत भारताचा अन्य सलामीवीर अभिषेक शर्माने सॅमसनचे कौतुक केले.

वेलिंग्टन येथे झालेल्या तिसऱ्या ट्वेन्टी-२० सामन्यात अभिषेकने वैभवसह अवघ्या सात षटकांत १३३ धावांची भागीदारी रचली. वैभवने १९ चेंडूंत ४५ धावा फटकावत आपली आक्रमकता दाखवून दिली. इशान किशनच्या दुखापतीमुळे वैभवला दुसऱ्या सामन्यातही संधी मिळाली होती. मात्र, त्यावेळी त्याला त्याच्यासाठी अनोळखी असलेल्या तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करावी लागली. परंतु तिसऱ्या सामन्यात सॅमसनने सलामीचे स्थान सोडल्याने वैभवला त्या जागी खेळता आले.

'बीसीसीआय'च्या अधिकृत संकेतस्थळावर वैभवशी संवाद साधताना अभिषेक म्हणाला, ''गेल्या सामन्यात संजूभाईने ज्या पद्धतीने फलंदाजी केली, त्यानंतर आपले नेहमीचे स्थान सोडणे सोपे नसते. त्याच्या या निर्णयातून त्याचा स्वभाव दिसून येतो. संघातील प्रत्येक जण निःस्वार्थपणे विचार करतो आणि सहकाऱ्याच्या यशात आनंद मानतो. हाच उत्तम संघाचा खरा गुण आहे.'' या सामन्यात अभिषेकने अवघ्या ३८ चेंडूंत ११३ धावा केल्या. वैभवने पहिल्याच चेंडूवर सीमापार फटका मारत सुरुवात केली, याचेही अभिषेकने विशेष कौतुक केले. ''त्याचा तो फटका पाहून मलाही अधिक स्फूर्ती मिळाली,'' असे अभिषेक म्हणाला.



'मोठ्या भावांची जबाबदारी'

आमच्या संघात १५-१६ वर्षांचा एक अत्यंत गुणवान मुलगा आहे. भारतीय क्रिकेटमध्ये इतकी प्रतिभा आम्ही यापूर्वी पाहिलेली नाही. त्यामुळे त्याला योग्य वातावरण देणे आणि त्याच्या कारकीर्दीला योग्य दिशा मिळावी याची काळजी घेणे, ही आमची जबाबदारी आहे, अशा शब्दांत अभिषेकने वैभवविषयीची आपुलकी व्यक्त केली. अवघ्या १५ वर्षांच्या वैभवला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये खेळताना कोणत्याही प्रकारचे दडपण जाणवू नये आणि त्याने आपल्या खेळाचा मनमुराद आनंद घ्यावा, यासाठी संघातील सर्व वरिष्ठ खेळाडू प्रयत्नशील असल्याचे अभिषेकने सांगितले.



एकदिवसीय मालिकेला प्रसिध मुकणार

नवी दिल्ली : भारताचा वेगवान गोलंदाज प्रसिध कृष्णा पायाच्या दुखापतीतून पूर्णपणे सावरलेला नसल्याने ४ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या न्यूझीलंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेला मुकणार आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) सूत्रांनी बुधवारी ही माहिती दिली. प्रसिधच्या जागी जम्मू-काश्मीरचा वेगवान गोलंदाज अकिब नबी याला संघात स्थान मिळण्याची शक्यता आहे.

गेल्या महिन्यात वेस्ट इंडिजविरुद्ध मायदेशात झालेल्या एकदिवसीय मालिकेदरम्यान प्रसिधला दुखापत झाली होती. गुवाहाटी येथे झालेल्या दुसऱ्या सामन्यात गोलंदाजी करताना त्याच्या मांडीच्या मागील स्नायूला दुखापत झाली. त्या सामन्यात त्याने पाच षटकांत ४५ धावा देत एक गडी बाद केला, पण दुखापतीमुळे त्याला आपली गोलंदाजी पूर्ण करता आली नव्हती.

पॅरा-भालाफेकपटू नीरज यादवची आत्महत्या

पीटीआय, नवी दिल्ली



पॅरा-आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज यादव याने विषप्राशन करून आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. उत्तेजक सेवनप्रकरणी निलंबित असलेल्या नीरजने मानसिक ताणातून हे टोकाचे पाऊल उचलल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

नीरजचे पार्थिव शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले असून, त्याच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. भारतीय पॅरा-ॲथलेटिक्स संघाचे मुख्य प्रशिक्षक एस. सत्यनारायण यांनी या घटनेला दुजोरा दिला. ''नीरजने आत्महत्या केली आहे. ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे. त्याच्याशी माझे जवळचे संबंध होते. हांगझो पॅरा-आशियाई क्रीडा स्पर्धेनंतर उत्तेजक सेवनप्रकरणी त्याच्यावर निलंबनाची कारवाई झाल्यापासून मी सतत त्याच्या संपर्कात होतो. तो मानसिक तणावाखाली होता,'' असे सत्यनारायण यांनी सांगितले.

मानसिक ताणाबरोबरच एका महिलेशी असलेले संबंध तुटल्यामुळेही नीरजने हे पाऊल उचलले असावे, असा प्राथमिक तपासानंतर पोलिसांचा अंदाज आहे. संबंधित महिलेनेच नीरजला रुग्णालयात दाखल केल्याचे पोलिसांनी सांगितले. नीरज विवाहित असून, त्याच्या पश्चात पत्नी आणि मुलगी असा परिवार आहे. वयाच्या सातव्या वर्षी त्याला 'पोस्ट-पोलिओ रेसिड्यूअल पॅरालिसिस' या आजाराचे निदान झाले होते.

आज भव्य शुभारंभ उद्घाटन सकाळी ११.३० वाजता
उद्घाटक : मा. समीर राजूरकर
महापौर, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
गृहोपयोगी व गृहसजावटींच्या वस्तूंचे
भव्य प्रदर्शन आणि विक्री
२९ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर
प्रवेश विनामूल्य
सेंट फ्रान्सिस स्कूल ग्राऊंड, जालना रोड, छ. संभाजीनगर.
THE SPECTACULAR DIWALI ATTRACTION FESTIVAL SHOPPEE
सकाळी ११ ते रात्री. ९
Welworth
● Home Appliances ● Furniture ● Food Products
प्रदर्शनाला भेट देणाऱ्या भाग्यवान ग्राहकाला आकर्षक बक्षिसे!

बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

मागणी सूचना

शाखा : सहकारनगर शाखा
१०४, कृष्णा टॉवर, दर्गा रोड, सहकारनगर, छत्रपती संभाजीनगर

प्राधिकृत अधिकारी यांनी खालील कर्जदार/जामीनदार यांना दि सेक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल असेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्टस् ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) नुसार नोटीस पाठवून ६० दिवसांचे आंत खाली निर्देशित रक्कम भरण्यास ... [illegible]

अ. क्र.	कर्जदाराचे / जामीनदाराचे नांव	मागणी नोटीस दिनांक व मागणी रक्कम रु.	तारण मालमत्ता/संरक्षीत संपत्ती
१	श्री. अभिजीत आप्पासाहेब सोनकांबळे	२१-१०-२०२६ १५,७०,७५५.०० दि. ०९/०९/२०२६ पर्यंत+व्याजदराने खर्च	सुरक्षा करारानुसार बोजा आणि नजरगहाण असलेली मोटार वाहन ज्याचा नोंदणी क्रमांक MH-20-HN-6452, चॅसीस क्रमांक MA1TJ2YJ2T6A61371, इंजिन क्रमांक YJS4M61106, बनावट : महिंद्रा अँण्ड महिंद्रा लिमिटेड. मॉडेल : स्कॉर्पीओ-N D MT 2 WD Z4 7S, रंग : काळा. कर्जदाराच्या नावे असलेले सध्याचे आणि भविष्यातील सर्व उपसाधने, जोडणीचे भाग, बदली भाग आणि त्यामध्ये केलेली भर या सर्वांसहित.

[illegible]

दिनांक : २८/१०/२०२६
ठिकाण : छत्रपती संभाजीनगर
(टिप : स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य)
सही /- प्राधिकृत अधिकारी बँक ऑफ बडोदा



Dr. Patangrao Kadam Sonhira Sahakari Sakhar Karkhana LTD.
AT. Post Mohanrao Kadamnagar, Wangi, Tal. Kadegaon, Dist. Sangli.
Pin Code.415305 .Phone No.02347-295606/07, sonhiraadm@gmail.com

Expression of Interest for BOOT Project

We are having 9500 TCD Sugar Cane crushing Plant with 22 MW Co-gen and 105 KLPD Distillery.

We are in the Market Calling for the EXPRESSION OF INTEREST (EOI) From Corporates, Companies or Partnership firms who are willing to Invest for setting up of 5 TPD Compressed Bio Gas (CBG) Plant Using Bio Gas from Pressmud Digesters and 30 MT organic Fertilizer Production Project on BOOT Basis.

An interested Investor may submit an Expression of Interest (EOI) which shall include following details.:

1. Details of Partners, Promoters and Directors, Developer Company Information: including its legal status, registration, ownership & Company Management Details like key personnel.
2. Experience in the Sugar Industry: Details of the company's experience in the construction, commissioning, operation and management of projects related to the sugar industry and its by- products. Even Start-ups, emerging entrepreneurs, and innovative organizations capable of supporting and contributing to the growth, modernization, and development of the sugar industry may also participate.
3. Financial Statements and Investment Capacity: Audited financial statements for the preceding five financial years, including Profit and Loss Statements, Balance Sheets, Income Tax Returns, a Financial Capability Certificate, details of investments, and other relevant documents demonstrating the investor's financial capacity to undertake and complete the proposed project. Also New entities with strong financial capacity, sound financial stability, and the ability to mobilize and invest substantial capital in the sugar industry may also participate.
4. Previous BOOT Projects in India: Details of any projects previously implemented by the investor or developer in India under the Build-Own-Operate-Transfer (BOOT) model [if any], along with relevant project details and supporting documentation.
5. The Interested investor or their representative shall visit our Factory site to inspect field Condition and for technical clarification before Submitting the EOI From 29/10/2026 to 05/11/2026 Up to 5.00PM. It will be mandatory for investor to mention the date and time of site visit along with self-attested Certificate of Geo tagging & Geo tagged Photo be mandatorily submitted with EOI.

The investor shall ensure that all information provided in the Bidding proposal is complete, accurate, and supported by the relevant documentary evidence. An interested investor has to submit their EOI to the following email address on or before **05th Nov 2026. (sonhirapurchase@yahoo.in)** An interested Investor may seek any technical clarification [if any required] from our Distillery Incharge between 3:00 p.m. to 5.00 p.m. only on Mobile No.**7498140040. Details of Applicable Terms & Conditions is available with Karkhana Office.**

S. L. Desai Managing Director — **T. N. Shinde** Vice Charman — **M. S. Kadam** Chairman

SBI
विपणन आणि संवाद विभाग, नववा मजला, कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०००२१

प्रस्तावाची विनंती

बिड क्र.: CC/M&C/२०२६-२७/०१ — दिनांक: २८.१०.२०२६

भारतीय स्टेट बँकेने पब्लिक रिलेशन (पीआर) एजन्सीची नियुक्ती करण्यासाठी पात्र बोलीदारांकडून निविदा मागवल्या आहेत. अधिक तपशीलांसाठी, कृपया बँकेची वेबसाइट **https://sbi.bank.in** येथे भेट द्या.

बिड समाप्त होण्याची तिथी आणि वेळ: १२.११.२०२६, १५:०० वाजेपर्यंत.

स्थळ: मुंबई — स्वाक्षरी/-
दिनांक: २९.१०.२०२६ — उप महाप्रबंधक (एम अँड सी)

महाराष्ट्र शासन अंगिकृत
पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे
(म्हाडाचा विभागीय घटक)
गृहनिर्माण भवन, (अलंकार थिएटरच्या मागे) आगरकर नगर, पुणे ४११००१. फोन : ०२०-२६१२१८३०

ई-निविदा/का.अ.१/पुणे/२०/२०२६-२७.
Main Portal :- http://mahatenders.gov.in

कार्यकारी अभियंता-१/पुणे मंडळ या विभागामार्फत ई-निविदा प्रक्रियेच्या माध्यमातुन डीजिटल स्वाक्षरी असणारे विनाशर्त ऑनलाईन ई-निविदा खालील नमुद केलेल्या कामासाठी मागविण्यात येत आहेत. ई-निविदा तपशील व दस्तऐवज वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर दि.२९/१०/२०२६ सकाळी ११:०० पासुन उपलब्ध असेल.

कामाचे नाव	ई-निविदा रक्कम	कालावधी	बयाणा रक्कम	ई-निविदा संचाची किंमत
पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या प्रशासकीय इमारती -वरील सोलार वीज प्रकल्प बसविण्याच्या कामाबाबत.	रु. ६८,०८,२२२/- (जीएसटी वगळून)	४ महिने (पावसाळा ऋतुसह)	रु. ६८,००० /-	रु. ११८०/- (जी.एस.टी. सह) विनापरतावा

निविदा स्विकृती अधिकाऱ्यांकडे निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व ई-निविदा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार राहील.

दि. २९.१०.२०२६ — स्वाक्षरीत/- कार्यकारी अभियंता-१ पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे १

महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनांस लि. — **मागणी सुचना**

कॉर्पोरेट कार्यालय: अगस्ती कॉर्पोरेट पार्क, पिरामल अमिटी बिल्डिंग, युनिट क्र. 203, दुसरा मजला, बी विंग, सुंदर बाग, कुर्ला पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र – 400070, भारत. CIN: U65922MH2007PLC169791 शाखा कार्यालय: एमआरएचएफएल साई ट्रेड सेंटर, दुसरा मजला, कार्यालय क्र. 204 (भाग) व 205, आरटीओ कार्यालयाजवळ, रेल्वे स्टेशन, औरंगाबाद – 431001.

सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम 2002 च्या नियम 3(1) सह सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अॅन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 च्या कलम 13(2) अन्वये, महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड चे अधिकृत अधिकारी ची अंमलबजावणी केली आहे. सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम 2002 च्या नियम 3 सह मिळालेल्या कायद्याच्याकलम 13(12) खाली देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकृत अधिकारीने कलम 13(2) या कायद्याच्या कलमानुसार खालील कर्ज देणा-या नोकरदारांनी दिलेल्या रकमेची परतफेड करण्यासाठी खालील कर्ज देणा-या व्यक्तींना कर्जदार (''कर्जदार'') मागितले आहे, ज्याची सामग्री पुन्हा खाली निर्मित केली आहे.

अनु. क्र	कर्जदार / जमानतदाराचे नाव	सुरक्षित संपत्तीचे विवरण (अचल संपत्तीकरीता)	सूचना दिनांक आणि मागणी रक्कम
1.	1313768 (XSEMNAN01032159), नांदेड शाखा कार्यालय श्रीनिवास पांडुरंग चव्हाण, पांडुरंग कानिराम चव्हाण, विमलबाई पांडुरंग चव्हाण, राजू रघुनाथ चव्हाण राहणार: शिरूर पोस्ट, मोगली, ता. उमरी, जि. नांदेड.	जी.पी.पी. क्र. 328/2, प्रभाग क्र. 3, ग्रामपंचायत शिरूर जी.पी. शिरूर, ता. उमरी – 431807, महाराष्ट्र, क्षेत्रफळ 1600 चौ. फूट. चतुर्सीमा : पूर्वेस – शाळा आणि रस्ता, पश्चिमेस – जयवंत कानिराम यांची मालमत्ता, उत्तरेस – शेतजमीन, दक्षिणेस – नरहरी कानिराम यांची मालमत्ता	मागणी सूचना दिनांक : 26-09-2026 रु. 4,65,885.33
2.	1006232 (XSEMAUR00835017), औरंगाबाद शाखा कार्यालय शेनपडू बाळा सोमासे, मंगलाबाई सोनाजी सोमासे, यशोदाबाई शेनपडू सोमासे, सोनाजी शेनफडू सोमासे, विकास सोनाजी मोरे राहणार: पोस्ट अमठाणा, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद).	मिळकत क्र. 714, गट क्र. 112, आमठाणा, आमठाणा, सिल्लोड, औरंगाबाद, महाराष्ट्र – 431113, क्षेत्रफळ 1089 चौ. फूट. चतुर्सीमा : पूर्वेस – नजमा तुर्ना शहा यांची मालमत्ता, पश्चिमेस – संजय गवनाजी सोमासे यांची मालमत्ता, उत्तरेस – सोनाजी भाऊराव मोरे यांची मालमत्ता, दक्षिणेस – रस्ता	मागणी सूचना दिनांक : 26-09-2026 रु. 4,61,224.00
3.	1393582 (XSEMNAN01064280) नांदेड शाखा रमेश विश्वनाथ जोगपेटे, श्रीमती अनुसया रमेश जोगपेटे पत्ता: श्री. पेंटेवार भारती धर्माजी, एनडी 14E 2/9, सिडको, नांदेड.	टेनमेंट क्र. 47 आणि 48, म्युनिसिपल क्र. 10-2-144 4 आणि 10-02-1445 तसेच म्युनिसिपल पिन क्र. 4057000430 आणि 4057000431, गट क्र. 80/P मधील हिस्सा, मौजे कौठा, म्हाडा कॉलनी, नांदेड, नांदेड – 431603 येथे स्थित, क्षेत्रफळ 1040 चौ. फूट. चतुर्सीमा : पूर्वेस – घर क्र. 49, पश्चिमेस – घर क्र. 46, उत्तरेस – 20 फूट रुंद रस्ता, दक्षिणेस – मागील बाजूची मोकळी जागा	मागणी सूचना दिनांक : 28-10-2026 रु. 11,96,264.00

वरील सूचनांनुसार, सदर कर्जदाराला महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड कडे पैसे पाठविण्याची सूचना देण्यात आली आहे. या नोटीसच्या प्रकाशन तारखेपासून 60 दिवसांच्या आत उपरोक्त निर्देशित रक्कम पुढीलप्रमाणे व्याज 2% दुपारी देय तारीख आणि / किंवा देय रकमेची पूर्तता होईपर्यंत वर नमूद केलेल्या तारखेपासुन. उपरोक्त सांगितल्याप्रमाणे उधारकर्तांना याव्दारे उपरोक्त म्हणून कंपनीला देय देण्याची सल्ला देण्यात आली आहे. जेणेकरुन कंपनी अधिनियमाच्या कलम 13(4) अंतर्गत पूर्णपणे सुरक्षित मालमत्तेविरुध्द कार्यवाही करणार नाही, उक्त कर्जदारांच्या जोखमीवर संपूर्णपणे खर्च आणि परिणाम.

स्थळ : औरंगाबाद, दिनांक : 29/10/2026 — **सही/- अधिकृत अधिकारी, महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**
अधुक माहिती करिता इंग्रजी मूळ मजकूर ग्राह्य केल्या जाईल.

SBI भारतीय स्टेट बँक, (सार्ब) : वर्धमान इमारत, दुसरा मजला, सेवन लव्हज् चौक, शंकरशेठ रोड, पुणे ४११०४२, फोन:०२०-२६४४६०४३/४४, sbi.10151@sbi.co.in.

ताबा नोटीस (नियम ८(१))
(अचल मालमत्तेकरिता)

[illegible]

दिनांक : २७.१०.२०२६ — सही/- अधिकृत अधिकारी,
स्थळ : पुणे — भारतीय स्टेट बँक (सार्ब), पुणे

EXPRESS Careers

INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY BOMBAY
Powai, Mumbai - 400 076

Advertisement No. RECT/ADMIN0003/2026

Indian Institute of Technology Bombay, an Institute of national importance adjudged as Institute of Eminence, invites online application for following vacancy of the post :

Sr. No.	Name of the Post	Pay Details	No. of Vacancy & Reservation
1.	Registrar (Job Ref. No. 50961951)	Pay Level 14 (144200 – 218200)	1 (UR)

For details regarding essential educational qualification, experience, general instructions etc., visit IIT Bombay website **https://ep.iitb.ac.in/jobsearch#**

The date of closing of online application interface is 27.11.2026

Date : 28.10.2026 — **REGISTRAR**

Maharashtra Education Society
'MES Bhavan', 1214-1215 Sadashiv Peth, Pune – 411 030.

REQUIRED

Name of Post	No. of Post	Place
Accountant	01	Panvel

- The candidate should be CA Inter / M. Com. / B. Com. with 5 – 10 years of experience; having sound knowledge of all the Accounting Systems and well conversant with Tally Prime Software and MS Office applications. He should be able to handle all the daily operations of Accounts, to prepare budget of the independent unit of the Society, to handle necessary taxation part of the Accounting System, preferably able to finalise the accounts of the unit, able to reconcile all the necessary transactions like, bank operations, fees collection, vendors, etc. and should be able to manage all types of payments.
- Salary will commensurate with experience & qualification.
- For more details visit - https://mespune.in

Chief Executive Officer

बँक ऑफ महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : लोकमंगल, १५०१, शिवाजीनगर, पुणे-५
आंचलिक कार्यालय, अग्रवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट - भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापूर, सोलापुर - ४१३००४
फोन : (०२१७) २७३३८७० / ७१, ई-मेल : legal_sol@bankofmaharashtra.bank.in

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदीसह वाचलेल्या सिक्युरिटीजेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना. सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदारांना आणि जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की **बँक ऑफ महाराष्ट्रकडे** गहाण ठेवलेल्या / चार्ज केलेल्या खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ते, ज्यांचा ताबा **बँक ऑफ महाराष्ट्राच्या** अधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, त्या **दि.१८/११/२०२६** रोजी कर्जदार आणि जामीनदारांकडून बँकेच्या थकबाकीची वसुली करण्यासाठी **'जसे आहे तिथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि काही आहे** ते या क्रमाने विकल्या जातील. कर्जदार आणि जामीनदार यांचे तपशील, देय रक्कम, स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि त्यावर ज्ञात असलेले बोजा, ताबा प्रकार, राखीव किंमत आणि बयाणा रक्कम देखील खालीलप्रमाणे दिली आहे-

अ.क्र.	कर्जदार आणि जामीनदाराचे नाव	देय रक्कम	मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन	राखीव किंमत / बयाणा रक्कम ठेव / वाढीव बोली
१)	शाखा : पारगाव कर्जदार : १) मे. शिवपार्वती ट्रेडर्स प्रोप. रेवण महारुद्र मोटे, रा. मु/पोस्ट-पारगाव, ता.वाशी, जि.धाराशिव-४१३५२६ २) श्री. रेवण महारुद्र मोटे, रा. मु/पोस्ट-पारगाव, ता.वाशी, जि.धाराशिव ४१३५२६ ३) सौ. वर्षा बबनराव जाधव (सौ. वर्षा रेवण मोटे), रा. मु/पोस्ट-पारगाव, ता. वाशी, जि.धाराशिव ४१३५२६	रु. ५३,९१,६१३.७२/- (रुपये त्रेपन्न लाख एकाण्णव हजार सहाशे तेरा आणि बाहत्तर पैसे फक्त) + व्याज खर्च आणि त्यावरील इतर शुल्क (लागू असेल त्याप्रमाणे) दि.२८/०४/२०२६ पासून लागू	मालमत्ता क्र.१ श्री. रेवण महारुद्र मोटे यांच्या नावे असलेली गहाण मालमत्ता. ग्रामपंचायत मालमत्ता क्र.१०५८ (जमीन गट क्र.९६/के पैकी) असलेल्या मालमत्तेचे सर्व सामाईक भाग, मु.पारगाव, ता.वाशी, जि.उस्मानाबाद, मोजमापीत क्षेत्रफळ २१७८ चौ. फूट आणि त्यावरील बिल्डिंग. खालीलप्रमाणे चर्तुःसीमा : पूर्व : रस्ता, पश्चिम : नॅशनल हायवे २११, दक्षिण : रस्ता व प्लॉट क्र.९, उत्तर : गोवर्धन भानुदास कोकाणे ताबा : प्रतिकात्मक	राखीव किंमत रु. ७०,००,०००/- (रुपये सत्तर लाख फक्त) ईएमडी रु. ७,००,०००/- (रुपये सात लाख फक्त) वाढीव बोलीची रक्कम : रु.२५,०००.००/- (रुपये पंचवीस हजार फक्त)

टीप:

अ. क्र.	तपशील		तारीख आणि वेळ
१.	दिनांक आणि ई-लिलावाची वेळ	अ.क्र.१ आणि मालमत्ता क्र.१ साठी	दि. १८/११/२०२६ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत.
२.	ईएमडी राखीव ठेवीसह बोली सादर करण्याचा शेवटची तारिख		दि. १७/११/२०२६ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत
३.	तपासणीची दिनांक आणि वेळ	अ.क्र.१ आणि मालमत्ता क्र.१ साठी	दि. ०२/११/२०२६ ते दि. ०७/११/२०२६ सकाळी १०:०० ते संध्याकाळी ५:०० वाजेपर्यंत

[illegible]

दिनांक : २९/१०/२०२६
ठिकाण : धाराशिव — (टिप : स्वैर भाषांतर तफावत पडल्यास मूळ इंग्रजी ग्राह्य) — सही/- मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी, सोलापूर क्षेत्र

हे पत्र मैसर्स इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, इ-२५, एमआयडीसी, वाळुंज, छत्रपती संभाजीनगर येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. ... मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३१९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. छत्रपती संभाजीनगर कार्यालय : १०३, गोमटेश मार्केट, न्यू गुलमंडी रोड, छत्रपती संभाजीनगर ... ■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर * (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. 1591/57 ...